The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत शेख महंमदांच्या अभंगातील प्रासंगिकता

**प्रा.डॉ. कल्याण गोपनर**
मराठी विभाग प्रमुख राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

शेख महंमद हे मध्ययुगीन संत परंपरेतील महत्त्वपूर्ण असे संतकवी आहेत. इस्लामी राजवटीच्या काळात दिल्लीचा मुघलबादशहा, विजापुरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, इंग्रजी आणि पोर्तुगीज आदि राजशाह स्वतःच्या सत्तेसाठी, स्वार्थापायी आणि अस्तित्वासाठी पूर्ण ताकदीनिशी एकसंध व एकजीवाने लढत होत्या. यांच्यातील संघर्ष लढ्यात सामान्य गरीब जनता मात्र भरडून होरपळली जात होती. आम समाजाकडे कोणाचेच लक्ष नव्हते. सर्वत्र अंधश्रद्धा कर्मकांड विकोपाला गेली होती. स्वतःच्या राजेशाहीसाठी सामान्यातल्या सामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले होते. जो तो आपलेच वर्चस्व निर्माण या गाजविण्याचा प्रयत्न करत होते. त्यातही देशात बहुसंख्या जनता हिंदू असतानाही आपल्या एकसंध धर्म कट्टरतेतून बहुतांश मुस्लिमांची सत्ता राजसत्ता होती. हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मात देव देव आणि पूजा अर्चाला अधिक महत्व होते. जो तो राजा आपापल्या देवधर्माला अधिक महत्त्व देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातही हिंदू मूर्तीपूजक होते, तर मुस्लिम मूर्तीपूजक नसून निर्गुण निराकार अल्लास मानणारे होते. हिंदू धर्म आणि त्यातील देवदेवता आणि मुस्लिम धर्मातील देवदेवता श्रेष्ठ की कनिष्ठ यामुळे समाजात जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था प्रबळ होत होत्या. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय मूल्ये पूर्णपणे पायंदळी तुडवून राजेशाही आणि हुकुमशाही एकहाती सत्ता निर्माणतेसाठी प्रयत्न होत होते. त्यामुळेच समानतेची वागणूक देणाऱ्या समाजसुधरकांची महान संताची आवश्यकता भासत होती. अशा जातीभेद, कर्मकांड वातावरणात मध्ययुगीन काळातील अनेक संतकवी जन्माला आले. त्यातच जातीभेद पूरक, कर्मकांडयुक्त वातावरण निर्माण काळात मुस्लिम मराठी संतकवी शेख महंमद यांचा जन्म झाला आहे. त्यांचा कोणत्या माता-पित्याच्या पोटी जन्म झालेला आहे. त्याचा तपशील रा.चिं. ढेरेंनी ‘मुसलमान मराठी संतकवी’ ग्रंथात नोंदविलेला आहे. ते लिहितात,

“याती गोरे (घोरी?) राज महंमद पिता |
सगुण पतिव्रता फुलाई माता |
ते प्रसवली अविनाश भक्ता |
शेख महंमदालागी ||[1] (योगसंग्राम 3.50)

स्वतः शेख महंमदाने 'योगसंग्राम' या ग्रंथात आपल्या स्वतःच्या आई-वडिलांची नोंद अभंगरूपाने या काव्यरूपाने केलेली आहे. त्यामुळे संदिगधतेचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. पित्याचे नाव राजे महंमद आहे. तर माताचे नाव फुलाई आहे. याच दांपत्याच्या पोटी संत शेख महंमदाचा जन्म झालेला आहे. हे निर्विवाद आहे; परंतु कुठे आणि केव्हा झालेला आहे? यातही आणि अभ्याकात मतभेद आणि मनभेद आहेत. संत शेख महंमदाच्या जन्म आणि मृत्यूच्या संदर्भात एक वाक्यता आणि एकसूत्रता दिसून येत नाही, मराठी अभ्यास संशोधकांनी आपापल्या आकलन क्षमतेनुसार जन्म मृत्यूच्या नोंदी निश्चित केलेल्या आहेत. चरित्रकार बा.ना. शिंदे यांच्या मते संत शेख महंमद यांचा जन्म शके 1548 (इ.स. १६२६) मध्ये झालेला आहे, तर महाराष्ट्र सारस्वत पुरवणी लेखक शं.गो. तुळपुळेच्या मते शके 1482 (इ.स.1560) आहे. तर श्रीगोंदातील मराठीतील फलकावर शके 1548 असे आहे. संतकवी शेख महंमदाच्या जन्म ठिकाणच्या संदर्भात रवींद्र गोळे यांनी 'अभंग सेतू संत वचनाचे अनुवाद भाग -1' मध्ये लिहितात, "शेख महंमदाचा जन्म बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील पुंडविहारे या गावात झाला"[2] अशी नोंद आपणास दिसून येते; परंतु जन्म वर्षाच्या बाबतीत एक निश्चितता सांगणे कठीण आहे असे संदिग्धता का निर्माण झाली आहे? हे सांगणे मात्र कठीणच आहे. त्यांच्या जन्मवर्षापेक्षा जन्मठिकाणाच्या बाबतीत एक वाक्यात निसंगिध्दपणे पाहायला मिळते.

संतकवी शेख महंमदांच्या जन्मवर्षाच्या बाबतीत अभ्यासकात संभ्रम व मत भिन्नता दिसून येते, परंतु त्याच्या मृत्यू ठिकाणात एक निश्चितता आहे. जन्माप्रमाणेच मृत्यू वर्षात खूप भिन्नता दिसून येते. संतकवी शेख महंमदाचा मृत्यू वा.सी. बेंद्रेच्या मते इ.स. 1672, तर डॉ. गं.ना. मोरजे यांच्या नोंदीप्रमाणे बेंद्रे यांनी इ.स.1560 ते 1660 हा काळ मानला आहे. पुणे विद्यापीठात 'शेख महंमदः व्यक्ती आणि वांङ्मय या विषयावर संशोधन करणारे डॉ. भीमा मोदळे यांनी विविध अभ्यासकांची मत भिन्नता लक्षात घेऊन इ.स. 1575 ते 1674 हा कालखंड मानावा असे म्हटले आहे. जन्म आणि मृत्यू वर्षाच्या बाबतीत प्रचंड मत भिन्नता आहे. संतकवी शेख महंमद यांचा जन्म आणि मृत्यूचा कालखंड नेमका कोणता प्रमाण मानावा? मध्ययुगीन संत वाङमयाचा अभ्यास करणाऱ्या मराठी भाषिकाच्या मनात प्रश्न निर्माण होतो. आज पर्यंत संतशेख महंमदाचे झालेले संशोधन मुळातून की वरवरचे झालेले आहे. जर झालेल्या शोध संशोधनात जन्म आणि मृत्यू वर्षात एकनिश्चित जाणवत नसेल, तर निश्चितपणे आजपर्यंत संत शेख महमंदावर झालेले संशोधन हे वरवरचेच झालेले आहे. असे म्हणावे लागेल. महंमदांच्या व्यक्ती आणि वांडमयाचा मुळातून तळ शोधण्याचा किंवा संशोधन चिकित्सा झालेली नाही. नाही तर पूर्वग्रह दूषित मुस्लिम धर्मव्देषातून अंदाजे, तर्क अनुमानयुक्त त्यांच्या जन्म आणि मृत्यू वर्षाच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत. हेच सिद्ध होते.

संतकवी शेख महंमद यांचा देह जेव्हा शांत झाला. या प्रसंगाला कोणी शांत झाले म्हणतात, तर कोणीच स्थिरावले म्हणतात, तर कोणी समाधीस्थ झाले, तर कोणी मृत्यू पावले असे म्हणतात, परंतु संत शेख महंमद हे जातीने व धर्माने मुस्लिम आहेत. मुस्लिम धर्मात एखादा व्यक्ती ज्या ठिकाणी पुरला गेला त्या ठिकाणी मृत्यूचा अंत्यविधी केला गेला, त्यास समाधी न म्हणता कबर म्हणतात, परंतु बऱ्याच अभ्यासकांनी संत शेख महंमदानी श्रीगोंदा (चांभार गोंदे) अहमदनगर येथे संजीवन समाधी घेतली आहे. असे लिहिले आहे. एखादा मुस्लिम संतकवी मराठीत लिहितो म्हणजे तो पूर्णपणे हिंदू होत नाही. हिंदू संस्कारातले शब्द मराठी मुस्लिम संतकवीस लावता येत नाहीत. हे पूर्णपणे चुकीचे आहे समाधी आणि कबर या संदर्भात प्रखड मत मुस्लिम मराठी साहित्य अभ्यासक डॉ. नसीम रहेतशाम देशमुख या संदर्भात लिहितात, "मुसलमान संतांनी समाधी घेतली असा आणखी एक आरोप केला जातो. इस्लामला समाधी घेणे मान्य नाही. इस्लामच्या दृष्टिकोनातून समाधी घेणे म्हणजे आत्महत्या करणे होय. इस्लाम धर्मात आत्महत्या करणे हे धर्म विरोधी कृत्य आणि पाप समजले गेले आहे. ह. मुहंमद पैगंबरानी खुनी आणि आत्महत्या करणाऱ्यासाठी नमाज ए जनाजा (मृतासाठी प्रार्थना) पढली नव्हती. ज्या अर्थी मुसलमान मराठी संताचे दर्गे अस्तित्वात आहेत. (समाधी नाही) त्या अर्थी त्या व्यक्तीचे मुसलमानासाठी केलेले इस्लाम धर्माचे कार्य इतके महान असेल की किती ते आपोआपच मुस्लिम संत किंवा अवलिया ठरले आहेत. मराठीत लिखाण केले म्हणजे ती व्यक्ती हिंदू होत नाही"[3]. डॉ. देशमुख यांचे मत अगदी खरे आहे कोणासही मनाने मुस्लिमत्त्वाचे हिंदुकरण करणे हे पुर्णतः चुकीचे आहे हिंदू धर्मातील संप्रदायातील विचार आवडतात किंवा त्यातील लोकसंस्कार आणि संत संस्काराचा प्रभाव आहे म्हणून तो व्यक्ती पूर्णतः शेवटच्या विधीमय होतो. असे पुराव्या अभावी संदर्भहीन लेखन करणे चुकीचेच आहे.

संतकवी शेख महंमद वारकरी या भागवत संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करत असले तरी त्यांचा जन्म मात्र सुफी संप्रदायातच झालेला आहे स्थळ काळानुसार आणि प्रसंगानुरूप दत्त, नाथ संप्रदायाचे सुद्धा संत संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. सुफी संप्रदाय हा अनुष्ठाण, भजन, पूजन, व्यासंग आणि योग साधना अव्दैत मानणारा अशा बहुआयामी लोकसंप्रदायाचे संत संस्कार आणि सदसदविवेकाची पताका खांदयावर घेऊन समतावादी विचाराचे वाहक संतकवी शेख महंमद होते त्यांचा अध्यात्म जीवन प्रवास सुफीसंप्रदाय ते वारकरी संप्रदाय असा राहिलेला आहे. त्यांनी सुफी म्हणजे मुस्लिम, इस्लामचे धर्मांतर करून भागवत म्हणजे हिंदू धर्म स्वीकारलेले आहे असे मुळीच होत नाही. देशात जे काही संप्रदाय आहेत त्यातील काही संप्रदाय बंदिस्त आहेत म्हणजेच चौकटीत आहेत. त्यामुळेच जेवढया गतीने निर्माण झाले. तेवढ्याच क्षमतेने व सामर्थ्यपुर्णतेने विकसित झालेले नाहीत त्यांचे कारण त्या त्या संप्रदायाची मर्यादा आहे. परंतु या देशात या पृथ्वीवर असा एकमेव संप्रदाय आहे

ज्यात सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी खुला आहे त्यास कोणतीही अट व शर्ती या नियम नाहीत असा अठरा पगड जातीचा, समतावादी, भागवतवादी, हरिनामवादी सर्वांना मिळून मिसळून घेणारा सरळमार्गी भक्ती मार्ग आनंदाने स्वीकारला व त्यातील मनोमन विचार भावला; म्हणूनच संतकवी शेख महंमदानी वारकरी संप्रदायाचा स्वीकार केला आहे, तसेच सर्व जाती धर्म वंश आणि लिंगभेदांना सोबत घेऊन पुढे चालणारा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाची ओळख आहे त्यातही विविधता आणि नावीन्यपुर्णता भिन्नतायुक्त अशा सर्वांनाच सामावून आनंदी जीवनाचा संस्कार मार्ग यात अनुभवायला मिळतो

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ' हाच वैष्णवाचा महत्वपूर्ण विचार जगातल्या प्रत्येक माणसाला मनोभावे आवडतो. कोण कुठल्या जातीचा धर्माचा आणि पंथाचा आहे याचा किंचितही भेदाभेद मानला जात नाही; म्हणून त्याचे उत्तम उदाहरण संतकवी शेख महंमद आहेत. 'यारे यारे लहान थोर | याती भलती नारी नर | करावा विचार नलगे चिंता कवणाशी' वारकरी संप्रदायात कोणालाही सहजपणे भक्ती करता येते. त्यासाठी सर्वांसाठी वारकरी संप्रदायाची दारे खुली आहेत ज्याला कोणी नाही, त्याला वारकरी संप्रदाय निश्चितपणे आपलासा वाटतो जो जो संतसंस्काराख्स याचा विचार स्वीकारतो. तो वारकरी संप्रदाय होतो.

संतकवी शेख महंमद हे सामान्य व्यक्तिमत्व नव्हते. तर अलौकिक असे संतच होते त्यांच्या संपूर्ण हयातीत लोककल्याणकारी असेच कार्य घडले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल मोगल सत्तेतील आलमगीर बादशहाणी जमीन इनाम देऊन व शरणही आले होते. तसेच निजामशाहीतील अनेक अधिकारी व सरदारही मालोजीराजे शेख महंमदाचे गुरुत्व स्वीकारले होते कारण संत शेख महंमद हे ज्ञानी, योगी आणि तपस्वी असे संत पुरुष होते. तत्कालीन अधिकारी व राजे महाराजेना दर्शन झाले होते. त्यामुळेच मालोजीराजे जी पाच चाहूर जमीन इनाम व मठास कोट विहीर बांधून दिली होती. यालाच इनाम व सनद म्हणतात अशा पद्धतीचा प्रत्यक्ष मालोजीराजांचा संत शेख महंमद महमदास आशीर्वादच होतो तेवढ्याच योग्यतेचे व पात्रतेचे संतकवी शेख महंमद होते. म्हणूनच मालोजीराजे शेख महंमदांना गुरु मानत.

संतकवी शेख महमदास वारकरी व सुफी संप्रदायाचा वारसा हा घरातूनच प्राप्त झालेला होता. रा.चिं. ढेरेच्या मते, "राजे महंमदांनी आपला पुत्र शेख महंमद याला आपल्या या प्रभावशाली शिष्य चांद बोंधलेंचे मार्गदर्शन प्राप्त करून दिले आणि लहान वयापासूनच त्यांच्यावर परमार्थाचे शुद्ध संस्कार होतील अशी व्यवस्था करविली असे दिसते. श्री दास गणू यांना प्राप्त झालेल्या स्थानिक माहितीप्रमाणे चांदबोधल्यांनी शेख महंमदाला गोदातीरी ज्ञानेश्वरीची प्रत दिली. या स्थानिक माहितीच्या पडताळा शेख महंमदाच्या वाणीवरील ज्ञानेश्वरी प्रभावातून येतो आणि चांद बोंधल्याच्या सानिध्यात शेख महंमदाने महाराष्ट्रातील पूर्व संतांचे वाङ्मय साक्षेपाने धांडोळले असावे. असे साधार अनुमान करता येते."[4] असे

विचार मराठी भाषा संशोधक रा.चिं. ढेरेंनी मांडले आहे. तेही शेख महंमदास वारकरी संस्काराचा विचार प्रभाव कसा निर्माण झालेला आहे. हे रा.चिं ढेरेंनी तर्क अनुमान पद्धतीने सांगितले आहे. परंतु निसंदिग्धपणे पुराव्यानिशी निक्षुनपणे मांडलेले नाही, म्हणूनच शेख महंमदाच्या अनेक प्रसंगाबद्दल मत भिन्नता पाहायला मिळते. प्रत्येक मराठी अभ्यासकांनी आपापल्या सोयीनुसार विचार मांडलेला दिसून येते.

शेख महंमदाचा चा विवाह हा फातिमाबीशी झालेला आहे. कधी केव्हा आणि कुठे झालेला आहे? या संदर्भात अधिक तपशील प्राप्त होत नाही. आपण जेव्हा शेख महंमद आणि त्यांच्या वाङ्मयाचा विचार करतो. तेव्हा लौकिक प्रपंचाचाही विचार करणे आवश्यक आहे; परंतु तसे लिहिलेले कुठे दिसून येत नाही. फातिमाबी हया कुठल्या आहेत त्यांचे हयातीतील शेख महंमदासह योगदान काय आहे? यासंदर्भात माहिती उपलब्ध नाही. फक्त पत्नी ते श्रीगोंद्यात शेख महंमदाच्या कबरी शेजारी कबर आहे. एवढेच माहिती मिळते. त्यांच्या लौकिक प्रपंच आणि वंशपरंपरेबदल रां.चिं.ढेरे म्हणतात, "शेख महंमद हा गृहस्थाश्रमी होता. त्याच्या पत्नीची कबर त्याच्या दर्ग्यात त्याच्या कबरी शेजारीच आहे. श्री गोंदे येथील मठाचा अधिकार वंशपरंपरेने चालत आलेला आहे. कादिरी परंपरेत (सिजरा-इ-कादिरीमध्ये) शेख महंमदानंतर दावलजी, हाकीमजी आणि बालासाहेब ही नावे क्रमाने आलेली आहेत. जनकोजी शिंदे यांच्या एका सनद पत्रात (20 डिसेंबर 1836) बालाबाबा हा शेख मंमदाचा पणतू असल्याचा उल्लेख आहे. त्यावरून दावलजी हा पुत्र आणि हाकीम हा नातू असावा, असे अनुमान संभवते"[5] काही ग्रंथात दावलजी, अजमजी आणि हकीमजी हे तिघेही संतकवी शेख महंमदाची मुले आहेत. असे लिहिलेले आहे. रा.चिं. ढेरे, तर 'मुसलमान मराठी संतकवी' या संशोधन ग्रंथात फक्त 'दावलजी' हाच मुलगा आहे. असे नोंदवले आहे. संतकवी कबीर शेख महंमदास मुलगा एक की तीन असे संभ्रम निर्माण करणारे प्रश्न निर्माण होताना दिसतात. अशा प्रकारच्या व्दंद माहितीबद्दल चुक नेमकी कोणाची आहे ? पुन्हा एकदा मुळातून संतकवी शेख महंमद यांच्या व्यक्ती आणि वाङ्मयाची चिकित्सा या संशोधन होणे गरजेचे आहे. तेव्हाच संशोधनातून अचूक माहिती वाचकांच्या समोर येईल.

संतकवी शेख महंमद बहुआयामी व बहुप्रसव असे महान व्यक्तिमत्व आहे. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यात मराठी हिंदी उर्दू आणि फारशी आरबी आदी भाषा आत्मसात होत्या; म्हणूनच अक्षर व अल्पक्षरत्व भाषेत अभंग, ओव्या रूपके, भारुडे, स्फुट अभंग आणि कविता आदी प्रकारात उत्तम रचना केलेली आहे. पंधराव्या आणि सोळाव्या शतकाच्या दरम्यानच्या काळातील सर्वांगपूर्ण असे श्रीमंत संत म्हणून संतकवी शेख महंमद यांच्याकडे पाहावे लागते. जवळपास दहा एक ग्रंथाची त्यांनी निर्मिती केली आहे त्यातील योगसंग्राम, पवनविजय, निष्कलंक प्रबोध, स्फुटरचना, अभंग, रूपके मदलसा हिंदी कविता, भारुडे' आदीरचना व ग्रंथ प्रकाशित आहेत तर साठीसवंतसर आणि ज्ञानगंगा'

इत्यादी ग्रंथ अप्रकाशित आहेत म्हणूनच संत कवी महंमद यांचे शिक्षण काय झाले आहे किंवा नाही. या माहितीची उपलब्धता मात्र कुठेच दिसून येत नाही. तरीही संतकवी शेख महंमद सामाजिक, सांस्कृतिक, परमार्थिक आणि ऐतिहासिक, तसेच वांङमयीदृष्ट्या त्याही पुढे जाऊन बहुभाषिकदृष्ट्या सर्वसंपन्न सर्वगुण आहेत. म्हणूनच मध्ययुगीन काळातील लोकसंस्कार आणि संतसंस्कार लाभलेले वाङमय श्रीमंत संत आहेत. संतकवीस शेख महंमदाचे गुरु चांद बोधले आहेत. ते स्वतःच स्वतःच्या दडणघडणरूपी गुरूचा उल्लेख 'योगसंग्राम' ग्रंथात केलेला आहे. ते लिहितात,

"ॐ नमोजी श्री सद्गुरू चांद बोधले|
त्यांनी जाणोपंता अंगीकारले |
जानोबाने एक उपदेशिले |
दास्यत्वगुणे"[6] (योगसंग्राम 15.1)

असाच उल्लेख त्यांनी दुसऱ्या एका गुरूबंधुच्या संदर्भात अभंगात नोंदवलेले आहे. ते अभंगात म्हणतात,

"धन्य चांद बोधले | त्यांनी जाणोपंता लोधले |
त्यांच्या शिषे धाले | एको जनार्दन |
केली भागवतटीका | उद्धार विश्वलोकां |
तेचि दिसे सायेका | स्वामीपाशी |"[7]

संतकवी शेख महंमद आणि जनार्दन स्वामी हे दोघेही संत चांदबोधले या गुरुचे शिष्य आहेत. अर्थात दोघेही गुरुबंधू आहेत. वरील अभंगात शेख महंमदानी स्पष्ट उल्लेख केलेला आहे. जनार्दन स्वामी हे संत एकनाथाचे गुरु आहेत. प्रश्न असा आहे की चांदबोधले संतकवी शेख महंमदाचे गुरु हिंदू आहेत की सुफी आहेत? काही ग्रंथात हिंदू आहेत असे स्पष्ट लिहिलेले आहे, तर काही ग्रंथात हिंदू नसून सुफीच आहेत. असे जर भाषा संशोधक परत्वे मांडणी होत असेल, तर ते पुर्णतः चुकीचेच आहे. ते डॉ. नसीम येथे रहतेशाम देशमुख यांनी 'मुस्लिम मराठी साहित्य: स्वरूप आणि समीक्षा' या ग्रंथात सुफी गुरू-शिष्य परंपरे बदल लिहितात,

"सय्यद महंमद गौस हा सुफीच्या कादरी शाखेचा पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धात धर्मप्रचारार्थ आलेला पहिला सुफी प्रचारक (इ.स. 1428 ते 1517) त्यांचा शिष्य राजे महंमद राजे महंमदाचा शिष्य चांद बोधले, चांदबोधल्याचा शिष्य शेख महंमद, शेख मंहमंदाचा शिष्य दावलजी, दावलजीचा शिष्य बावा त्याचा शिष्य मंगलबावा (इ.स.1836 मध्ये हयात) अशी ही मुस्लिम सूफी संतांचे गुरु शिष्य परंपरा"[8] डॉ. देशमुखांनी सुफी गुरु-शिष्य परंपरेच्या बाबतीत जे मत मांडले आहे. ते सर्व ज्ञात असेच आहे सुफी हा इस्लाम धर्माचा एक संप्रदाय आहे. या संप्रदायाचा प्रारंभ हजरत महंमद पैगंबरापासून

झालेला आहे. असे मानले जाते. महंमद पैगंबरास परमेश्वराचे रूप मानले जाते. रा.चिं. ढेरे ग्रंथात संत बोधलेच्या संदर्भात प्रचंड धाडसी आणि टोकाचे विधान करतात ते म्हणतात चांद बोदल्यांची सुफी साधना आणि सुफी वेश स्वीकारला असल्यामुळे तो हिंदू असुनही त्याचे समाधी मंदिर दर्ग्याच्या स्वरूपात आहे"[9] चांदबोधले हे खरेच हिंदू होते की त्यांना सुफी केले गेले. रा.चिं.ढेरेचे प्रमाण मानावे की डॉ. नसीम देशमुखाचे प्रमाण मानावे. वाचकांच्या मनात निश्चितपणे दोलायमान निर्माण होतो डॉ. रा.चिं. ढेरे चे मत डॉ. नसीम देशमुख पुढीलप्रमाणे संदर्भासह खोडून काढलेले आहे. ते प्रत्येक वाचकाच्या बुद्धीस प्रमाणही वाटते. ते लिहितात, चांदबोधले हे सैय्यद चांद साहेब कादरी होते. चांदबोधल्यांच्या देवगिरीच्या पायथ्याशी दर्गा आहे. समाधी नाही. रा.चिं ढेरे यांनी आपली पूर्वग्रह दूषित बुद्धी चालवली आहे. येथे प्रश्न निर्माण होतो, हिंदू संतांच्या समाधीवर मुसलमान दर्गा बांधणार कसा हिंदू तरी बांधू देतील का?"[10] डॉ. नसीम देशमुखांनी चांदबोधलेच्या संदर्भात मांडलेले विचारच योग्य आणि प्रमाण आहेत. संतकवी शेख महंमदांचे गुरु चांदबोधले हे हिंदू नसून सुफी म्हणजेच इस्लामच आहेत. फक्त संतकवी शेख महंमदावर इतर संप्रदायाप्रमाणे वारकरी संप्रदायाचा व त्यातील मानवतावादी आणि समतावादी विचाराचा प्रभाव होता. हेच इथे सिद्ध होते. आणखी एका संशोधन ग्रंथात रा.चिं. ढेरे चांदबोधले संदर्भात विचार मांडतात ते लिहितात, "शेख महंमदाचा पिता राजे महंमद हा या महंमद गौसचा शिष्य होता. पिता हा शेख महंमदाचा परमगुरु होय. राजे महंमदाचा शिष्य चांदसाहेब कादरी म्हणजे प्रख्यात हिंदू साधू बोधले होय."[11]

एखाद्या व्यक्ती मुस्लिम असतानाही त्याला हिंदू आहे म्हणने प्रचंड चुकीचे व धाडस आहे. असे लिहिणे म्हणजे त्या त्या विषय भाषेचे विकृत संशोधन करणे होय. आज जरी आपण खोटं नाट आणि अनुमान व अंदाज काढून जरी लिहिले, तरी येणाऱ्या पुढील काळात पाळंमळं शोधून तळ ढवळून त्याचे मुळातून संशोधन करणारे भाषा अभ्यासक निश्चितपणे जन्माला येतात. यावरून असे म्हणता येईल की जशी इतिहासाच्या पुनर्संशोधनाची आवश्यकता आहे. तसेच मध्यमयुगीन मराठी संत व त्याच्या वाङ्मयीन निर्मितीचे पुनर् संशोधन करून नव्याने मांडणी करण्याची आवश्यकता आहे. त्या त्या काळात आपापल्या आकलनक्षमतेनुसार संत वाङ्मयाची संशोधनरूपी चिकित्सा व मांडणी केलेली आहे. त्याचे मुळातून सत्यान्वेषण होणे गरजेचे आहे. संतकवी शेख महंमद भक्ती विचाराने कसे होते? ते स्वतःच्या अभंगात लिहितात,

"ऐसे केले या गोपाळे | नाही सोहळे ओवळे |
काटे केतकच्या झाडा| आत जन्मला केवडा|
फणसा अंगी काटे | आंता अमृताचे साठे |
नारळ वरुता कठीण | परी अंतरी जीवन मधमाशांची घोंगाणी |

आता अमृताची खाणी | शेख महंमद अविंध त्याचे हृदयी गोविंद"[12]

संतकवी शेख महंमदाच्या अभंगातून व्यक्त झालेला विचार जातीय व धर्माधतेचा चष्मा असलेल्या व्यक्तींच्या विचारांची चिरफाड आहे. एखाद्या विचारांची भक्ती या नामस्मरण करण्यासाठी विशिष्ट धर्माचा या जातीचाच व्यक्ती आवश्यक आहे. असे अजिबात नाही तो कोणत्या धर्माचा आहे त्यापेक्षा तो कर्माने किती श्रेष्ठ आहे? या संदर्भात त्यांनी केतकीचे झाड फणसाची काटे, नारळ वरून कठीण, मधमाशीची घोंगणी आदी दृष्टांत अभंगातून मांडून जातिभेद मांणणाऱ्या लोकांना निरूत्तर केले आहे. भगवंत या गोविंद प्रत्येकाच्या मनात असतो. त्यासाठी भक्तिमार्ग हा निखळ असणे गरजेचे आहे. ते संतकवी शेख महंमदाचा ठायी ठायी पाहायला मिळतो. शेख महंमद जातीने मुस्लिम जरी असले, तरी त्याचे हृदय हे गोविंद आहे. त्यासाठी भक्तीसाठी जात आडवी येत नाही.

संतकवी शेख महंमदानी सहज साध्या सोप्या भाषेत सामान्यातल्या सामान्य माणसाला समजेल अशी अभंग रचना केली आहे. जशी कबीराची ख्याती होती. त्याच्याच वळणावर संत शेख महंमदानी अभंग निर्मिती केली आहे. डॉ. बाबासाहेबांनी संत कबीरास गुरु मानलेले आहे. याचाच अर्थ संत कबीर हे प्रबोधन विचार दोहयाच्या रचनेत प्रचंड मोठे योगदान आहे. तव्दतच संत कबीराचा संतकवी शेख महंमदावर प्रचंड प्रभाव आहे; म्हणून लोक माणसाची धारणा ज्ञानाचा एका, नाम्याचा तुका आणि कबिराचा शेखा, अशीच आहे. त्याच उदात विचाराने शेख महंमदांनी अभंग निर्मिती केली आहे. इतर चरित्रकारांनी कबीर आणि शेख महंमद यांच्यात साम्य कसे आहे? ते लिहितात,

"शेख महंमद पीर | कबिराचा अवतार |
त्याचे तयाचे चरित्र | ऐका तुम्ही |
कबिराचा अवतार | जनांशी कळेना |
उमज पडेना भवभ्रांती"[13]

वरील अभंगातून असे स्पष्ट होते की, संत शेख महंमद हे संत कबिराच्या वृत्ती आणि प्रवृत्तीचे मुक्तचिंतक आहेत. जसे कबीर आणि तुकारामात साम्य आहे, तसेच कबीर आणि शेख महंमद यांच्या रचनेत सुद्धा साम्यता दिसून येते. समाजातल्या अनिष्ठ, कुप्रथा चाली रीती परंपरेवर हातोडा आणि सदविवेकवादी सत्यशोधक निर्मिती केली आहे. जसे संत तुकाराम, संत कबीर आजही समाजाला जेवढेच महत्त्वाचे वाटतात आणि तीच परंपरा पुढे घेऊन जाणारे अभंग विचार संतकवी शेख महंमदाच्या अभंगात दिसून येतात; म्हणूनच संतकवी शेख मोहम्मदास कबिराचा अवतार संबोधले जाते. प्रचंड ताकतीचा संतकवी कबीर आहेत. तेवढ्याच क्षमतेचे उंचीचे मध्ययुगीन संत परंपरेतील महत्वपूर्ण संताजी शेख महंमद आहेत. ते अभंगात लिहितात,

"अनिवार पंढरी| अविनाश श्रीहरी |

वाहीन अंतरी| व्यापुनि अलिप्त|
मूर्ती लपविल्या| अविधी फोडिल्या|
म्हणती दैना जाल्या | पंढरीच्या"[14]

संतकवी शेख महंमद सुफी जरी असले, तरी मनाने व विचाराने मात्र पांडुरंगमय होते. समाजात देवधर्म मुर्तीची होणारी तोडफोड, विटंबना पळवा पळवी आणि लपवालपवी हे त्यांना पहावेसे वाटत नव्हते.

अशा प्रकारचे कृत्ये हे समाज व धर्मविघातक आहे. हे ओरडून प्रबोधनातून सांगत होते; परंतु हिंदू लोकास विश्वास बसत नव्हता. कारण संतकवी शेख महंमद सुफी असल्यामुळे संतकवी शेख महंमद हे पूर्णपणे धर्मनिरपेक्ष समाजवादी संत होते. तसेच हिंदू आणि सुफी विचार एकात्मतेचे प्रतीक होते. आजही त्यांचे अभंग विचार सर्व जाती धर्माच्या हृदयात वास करत आहेत. या संदर्भात रवींद्र गोळे लिहितात, "फाल्गुन शुद्ध नवमी ही शेख महंमदाची पुण्यतिथी. या दिवशी श्रीगोंदा यात्रा भरते. श्रीगोंदाचे ग्रामदैवत म्हणून शेख महंमदांना मान आहे. हिंदू-मुस्लिम समाज शेख महंमदाचे भक्त असून उत्सव काळात राष्ट्रीय, धार्मिक एकात्मतेचे दर्शन श्रीगोंदात पाहायला मिळते"[14]. म्हणून संतकवी शेख मोहम्मदाचे मध्ययुगीन काळातील विचार कार्य हे आदर्श वचन होते. त्यांच्या कार्य व विचाराचे फलित म्हणजे त्यांचे अभंग होय. म्हणूनच शेख महंमद आणि त्यांचे भंग न पावणारे चिरंतन, शाश्वत अभंग रचना जिवंत आहे. पुढे अभंगात संतकवी शेख महंमद लिहितात,

बाभळीच्या झाडा |आंबे आले पाडा|
अपरोक्ष निवाडा| शेख महंमद|
यातिं मुसलमान| मऱ्हाष्ट्री वचने|
ऐकती आवडीने विप्र शूद्र |इंद्रावळी वेली|
खरबुजे पिकली| ते भावे सेविती सदाचारी|
मुसलमान याती | निपजली मती अधिकारी होती| अठरा पगड|"[15]

पंधराव्या सोळाव्या शतकाच्या काळात संतकवी शेख महंमदाची रचना निर्मिती ही काळाच्या पुढे जाऊन सर्व समाजाला सशक्त सामर्थ्यपूर्ण अशी जिवंत दिशा होती. कोण कोणाच्या पोटी या जाती धर्मात जन्माला यावे. हे कोणालाही सांगता या ठरवता येत नाही. हया हयाजातीत जन्माला म्हणून श्रेष्ठ आणि त्या त्या जातीत निपजला म्हणून कनिष्ठ. हे श्रेष्ठ आणि कनिष्ठ ठरविण्याचे मापदंड या निकष काय आहेत? हे कोणी ठरवले आहेत? असे एक ना विविध प्रश्न मनात सतत निर्माण होतात. अशा निरर्थक विचार प्रसारामुळेच समाजातील धर्मांध नशा काही कमी व्हायला तयार नाही. त्यापेक्षा स्वतःबरोबर समाज, देश, राष्ट्राच्या उन्नतीसाठी आणि विकास परिवर्तनासाठी काही योगदान देता

येईल का? हे जो व्यक्ती करेल, तो मुसलमान असो या अन्य कोणत्याही जाती धर्मातील असो तो निश्चितपणे महानच आहे. याच योग्यतेचे संतकवी शेख महंमद आहेत. तासंतास विचारच करत राहावा, इतकी प्रचंड उद्‍बोधक विचार वाहकता शेख महमदाच्या अभंगातून दृगोचरीत होते. सामान्य माणसापेक्षा नेहमी संत हे अलौकिक व असामान्य असेच असतात. म्हणूनच आपण अशा व्यक्तिमत्त्वांना व्यक्ती न म्हणता संत म्हणतोत तळागाळातील समाजातील अवतीभवतीच्या काही अनिष्ठ चालीरीती परंपराचे ते सूक्ष्म निरीक्षण व अवलोकनातून समाजावर नेमके भाष्ये करतात चुकीच्या दिशेने समाज वाटचाल करत असेल, तर संतांना पाहावत नाही. त्यांचे मन ऱ्हदय संवेदनाशील बनते. लगेच त्यांच्या वाणीतून मानवतावादी संतत्वाची कवित्व रचना स्फुरते ते 'योगसंग्राम' ग्रंथात लिहितात,

"देवता असत्या सामर्थ्यपणे |
तर तोंडावर का मुतती श्वाने |
प्रसिद्ध देखोनि झकली |
अज्ञाने कनिष्ठ भजन करिती" (योगसंग्राम 14-54-58)

संत कवी शेख महंमद हे खऱ्या अर्थाने एक आदर्श संतकवी आहेत. समाजात रूढी, प्रथा आणि अज्ञानातून बोकाळलेल्या अंधश्रद्धेवर वेळप्रसंगी कडाडून हल्लाही चढविता. ते कोणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. संत महंमदानी अभंगातून जो विचार मांडलेला आहे. तो तत्कालीन काळातील प्रचंड मोठ धाडस आहे. आज एखाद्‍या व्यक्तीने स्पष्ट आणि रोखठोक समाज कुप्रवृत्तीवर प्रहार केला तर सत्य बोललेले कोणालाही आवडत नाही. त्या काळात संत शेख महंमदाच्या विचारांना स्वीकारणारे किती लोक असतील? माझ्या मते तरी महंमदाच्या विचाराचा पुरस्कर करणारे कोणीच नसावे? फक्त आणि फक्त एकटेच सुफी संतकवी शेख महंमद चुकीच्या प्रथा, परंपरा विरुद्ध प्रबोधन विचारा.चिं लढाई लढत होते.

ते मुरळी प्रथेबददल लिहितात,

ज्या मुरळ्या करिती अनाचार|
चालविती उन्मतांचे घरचार|
त्यास म्हणती लावी भंडार |
आपुलिया हाते | पुण्य आचरण न ये |
मुरळ्यांच्या चित्ता भलत्याच्या होतील कांता|
त्यांचा हात भाळास लाविता|
कोण तरला सांग बा..." (योगसंग्राम 14-54-58)

जसे संत तुकाराम, संत कबीर इतर सर्वच संत आपल्या अभंगातून समाजातील अनिष्ट प्रथा चालीरीती, रूढी परंपरेवर ताशेरे या फटके मारतात, तसेच संतकवी शेख महंमदही मुरळी प्रथेवर कडकडून प्रहार करतात.

अशा प्रकारच्या अमानवतावादी प्रथा संतकवी शेख महंमदास मुळीच आवडत नाहीत; म्हणून समाजातील कोणतीही चुकीची गोष्ट त्यांच्या नजरेतून सुटलेली नाही. कोणतेही संत आपल्या जाती धर्माचा विचार करत नसतात तर समग्र मानवजातीचा विचार करणारे व्यक्तीस महान व्यक्ती संतपदाला जाऊन पोहोचतात तशाच कार्य विचारांची परंपरा शेख महंमदानी आपल्या कार्यकाळात केलेली आहे. हे कोणासही नाकारताही येणार नाही. आणि पुसूनही टाकता येणार नाही. त्यांनी प्रचंड अजरामर आणि शाश्वत असेच संतत्व वारकरी कार्य फुलविलेली आहेत. एका काव्य रचनेत हरीभक्तीच्या संदर्भात संतकवी शेख महंमद लिहितात,

“उत्तम कुळी काय |
जाळावी विप्राची |
जो नाही हरीची|
बोधे भक्ती” (कविता 175)

संतकवी शेख महंमद हे सर्वसामान्य जणांचा व मनाचा सूक्ष्मशोध पूर्ण अभ्यास असलेले लोककवी आणि लोकसंत आहेत. त्यामुळे जो हरीची भक्ती करत नाही. ज्याचे मन निर्मळ नाही. तो कोणत्याही श्रेष्ठ कुळात जन्माला येऊन उपयोग नाही. त्याचे उत्तम कुळ विप्र म्हणजे ब्राह्मण जाळावे काय? असा सवाल शेख महंमदानी कवितेत समाजाला उद्देशून विचारलेला आहे. काहीची भक्ती ही दिखाऊ असते. ते काय जाळायचे आहे का? असे एक ना अनेक प्रश्न संत शेख महंमदानी कवितेत उपस्थित केलेले आहेत. संतकवी शेख महंमदांच्या भाषा आणि वाणीची जडणघडण कशी झालेली आहे? हे त्यांच्या रचनेतून पदोपदी जाणवते. समाजात सर्वत्र संचार करणारे लोक परंपरा आणि लोकसंस्कृतीचे पाळीमुळे समजून घेऊन रचना निर्मिती करणारे, खरे लोकसंत आहेत. त्यांच्या रचनेत जनमानसाच्या लोकभाषेचा प्रभाव जाणवतो यासंदर्भात रा.चिं ढेरे लिहितात, “भाषेच्या बाबतीत शेख महंमद समर्थाचा पूर्वगामी शोभतो. वाणीचे विविध विलास व्यक्त करणे त्याला रुचत नाही. जे म्हणायचे असेल ते सरळ म्हणून टाकणे हीच त्यांची पद्धती आहे. त्याला अभिप्रेत असणारा श्रोतृ समाज हा संमिश्र म्हणजे सर्व थरातील असल्यामुळे तो अनेकदा उघडी नागडी भाषा वापरतो. अनिष्टावर हल्ला करताना ग्राम शब्दाचा वापर करायलाही बिचकत नाही. लोकात प्रचलित असलेले, त्यांच्या बहुश्रुततेच्या कक्षेत बसणारे सुगम पौराणिक आणि व्यावहारिक दृष्टांत वापरण्यात त्यांचा हातखंड आहे. लोकाभिमुख वक्ता ज्याप्रमाणे दृष्टांत संक्षेपाने न सांगता त्याला कथेचे स्वरूप देतो तसेच शेख महंमदाने केले आहे.”[16]

संतकवी शेख महंमदाचा भाषेच्या संदर्भात रा.चिं. ढेरेंनी मांडलेले मत यथार्थ असेच आहे. म्हणून कोणत्याही समाजाची लोकभाषा कशी आहे? त्यावरच संताची अभंगे, कविता आणि अन्य वाङमयीन रचनांची निर्मिती अवलंबून असते. कोणत्याही भाषेला शब्दांची रसद पुरवण्याचे कार्य त्या भाषेतील शब्द, म्हणी, वाक्यप्रचार, उखाणे, उपमा, अलंकार, प्रतिमा आणि प्रतीके आदीमुळे भाषा समृद्ध होते. त्या त्या काळाची भाषा किती व्यमिश्र आणि विविधतेने नटलेली आहे. त्यामुळेच कोणत्याही सर्जनशील निर्मितीचे फलित अविट तयार होते. संतकवी शेख महंमदाच्या रचनेत जनमानसाच्या दैनंदिन लोकजीवनात वापरण्यात येणाऱ्या म्हणी 'योगसंग्रामाच्या काव्या रचना निर्मितीत कशा लिहिलेले आहेत? शेख महंमद लिहितात,

पहा पाथरवटे पाषाण घडिला|
मग तो टाक्या सोसूनी मूर्तावला |
तैसे धैर्य पाहिजे साधूला|
जन निंद्री ते वेळे |" (योगसंग्राम 18.134)

अशा प्रकारच्या म्हणी तेव्हाही आणि आजही जनमाणसाच्या मुखातून सहजपणे मौखिक स्वरूपात सर्वत्र व्यक्त होताना दिसतात; परंतु संतांनी याच म्हणी वेगळ्या आणि मोजक्या वक्रोवत्तीपणे रचनेत शब्दबद्ध केलेल्या आहेत. कोणतेही संत सुद्धा एका समाजाचेच अविभाज्य घटक असतात समाजाच्या मूळ भाषेची साधन सामग्री वापरून तिला सौंदर्याचा सांजश्रृंगार प्राप्त करून देतात. हेच संत महात्म्याचे वेगळपण आहे. 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही' ही लोकम्हण जनमानसात आज सर्वत्र रूढ आहे; परंतु तत्कालीन काळात सुद्धा हा विचार समाज सहजपणे दैनंदिन बोलण्यात वापरत होता. हेच सिद्ध होते. सर्वच संतांचा संतकवी शेख महंमदांच्या रचना निर्मितीवर प्रभाव जाणवतो. त्यामुळेच त्यांची अभंग व काव्य निर्मिती आजही प्रत्येक माणसाच्या मनाचा ठाव घेणारी जिवंत व ताजीतवाणी आहे. तसेच संत ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरीतील रूपकांचा प्रभावही योग संग्राममध्ये जाणवतो; संतकवी शेख महंमद हे बहुआयामी बहुप्रसव संतकवी आहेत ज्ञानेश्वरीतील रूपके आणि 'योगसंग्राम' मधील अभंगाची साम्य स्थळे पुढील प्रमाणे आहेत.

"आता आत्मचर्चा नीच नवी |
तेची करू नी ठाणादिवी |
जे इंद्रियाते चोरूनु जेवी तेयाचीच फावे" (ज्ञानेश्वरी 6.23).

"आत्मचर्चा हे नित्य नवी |
ज्ञानाची करु नी ठाण दिवी |
पांचा इंद्रयाते चोजऊनि जेवि तोचि जेवणार" (योगसंग्राम 3.76)

शेख महंमदाची समग्र रचनाच कोणत्यान कोणत्या संताच्या प्रभाव वळणातून पाझरताना दिसते. तसेच वेश्या, पुरणकथा, दृष्टांत म्हणी, रूपके, संस्कृत वाचनाचा अनुवाद, हिंदी रचना, उर्दू आणि फारशी, अरबी आदी व इतर घटकांच्या प्रभावमुशीतून शेख महंमदाची अभंग काव्यरचना उत्तुंग अशा यशोशिखरापर्यंत पोहोचलेली आहे. संत कबीरांनी जशी रचना केलेली आहे. तशीच त्यात वळणाची आशया भावार्थाची अभिव्यक्ती 'योगसंग्राममध्ये' व्यक्त झालेली आहे. म्हणूनच शेख महंमद संत कबीर प्रकृती मुक्त चिंतन संतकवी म्हणून संबोधले जाते. जसे कबीर लिहितात,

"सात समंदर मसि करै,
लेखनी सब बनराय,
धरती सब कागद करै,
हरिगुन लिखान जाय" (कबीर ग्रंथावली)

तसेच त्याच प्रभावाने संत शेख महंमद लिहिताना दिसतात,

"महिएवढा कागद थोर,
लेखणीस अठरा भार
तरुवर मैस कलिया सप्तसागर
पूर्ण नव्हेच नाम" (योगसंग्राम 14.99)

संतकवी शेख महंमदाची वाङमयीन रचना विविध भाषा संस्कारानी नटलेले विचार सुगंधी फुल आहे. त्यास कितीही झाकण्याचा या लपविण्याचा प्रयत्न केला, तरी रचनेची प्रकृती आणि अंतरंगातील प्रबोधन गंध थांबवू शकत नाही. इतरांचा प्रभाव जरी असला, तरी प्रचंड सामर्थ्यपूर्ण अशीच स्वतंत्र रचना निर्मिती आहे डॉ. नसीम देशमुख यांनी मराठीतील ख्यातकीर्त समीक्षक नरहर कुरुंदकर यांच्यावर प्रचंड मोठा आरोप केलेला आहे. ते फ.म. शहाजिंदे यांच्या 'निधर्मी' कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत लिहितात, डॉ. ढेरे यांनी परिचय करून दिलेले सर्व मुसलमान कवी मुस्लिम समाजा जन्माला आले इतक्या अर्थानेच मुसलमान आहेत. पण त्यांची भाषा विचार वाङमयीन संस्कृती सारे लिखाण अगदी हिंदू आहे. शेख महंमद सारखा कवी 'योगसंग्राम' सारखा ग्रंथ लिहितो या ग्रंथात त्यांचे नाव शेख महंमद सोडले, तर तो मुसलमान असल्याचा कोणताच पत्ता लागत नाही."[17] प्रा. नरहर कुरुंदकर यांचे वरील विधान या मत डॉ. नसीम देशमुख यांना बेजबाबदार व पूर्वग्रहदूषित जातीवादी वाटते. प्रा. कुरुंदकरान सारखे विद्वान अभ्यासू समीक्षक असे मत मांडत असतील, तर वाचकांचा विश्वासच बसतो. परंतु हे वासत्वात असे नाही. असे प्रा. कुरूंदकरांनी संतकवी शेख महमदांचा 'योगसंग्राम' मुळातून वाचले असते, तर असे टोकाचे, चुकीचे मत मांडलेच नसते. योगसंग्राम

ग्रंथाच्या सतराव्या प्रसंगात संतकवी शेख महंमद श्री गणेश आणि अल्लाहाच्या नावाने प्रारंभ केला आहे. ते लिहितात,

“श्री गणेशाय नमः| जले जल्लेजला लहु अल्ला गनि प्यारा |
जय जय जी, जयवंत नरा| विश्वव्यापक नीज परमेश्वरा|
रहिमान साचा अव्वल समजो एक बिसमिल्ला |
मग सहस्त्र नामे विश्व व्यापला | बदंगी कसे छोडो गलबला|
सद्गुरु सेवूनिया|”

वरील प्रसंगात या काव्यरचना श्लोकात संतकवी शेख महंमद हे सुफी संतकवी आहेत. हे ततक्षणी लक्षात येते इथे त्यांनी हिंदू मुस्लिम धर्मातील देवदेवतांचा तेवढ्याच सन्मानपूर्वक उल्लेख केलेला आहे. मुळात संतकवी शेख महंमदावर दोन्ही धर्माचा प्रभाव आहे. ते जन्माने इस्लाम सुफी आहेत; परंतु कर्म विचाराने उमयी आहेत. त्याहीपुढे जाऊन ते उदात्त विशाल मानवतावादी संत आहेत. पुढे योगसंग्रामच्या 18 व्या प्रसंगातील श्लोकातही हाच विचार व्यक्त होतो. ते लिहितात,

“मेंढ्याचा वेष असे मरण,
त्यातेल ईश्वर टाकिती मारून,
मेहत्तर जिब्राइलाच्या हाते ओळखा खूण,
कुराण प्रसिद्ध” (योगसंग्राम 18:302)

संतकवी शेख महंमदाच्या ‘योगसंग्राम’ ग्रंथरचनेत अरबी, उर्दू आणि फारशी भाषेतून बरेच शब्द आलेले आहेत. आदी भाषेच्या ज्ञान आकलन सुलभतेच्या अभावग्रस्ततेतून चुकीचे मराठी मुस्लिम संताचे संशोधन झालेले आहे. असेच निष्पन्न होते. मराठी मुस्लिम संताच्या संशोधन अभ्यासकात फक्त डॉ. यु.म. हे एकमेव फारशी अभ्यासक आहेत. त्यांनीच मराठी मुस्लिम संत साहित्याचा चिकित्सक संशोधन अभ्यास केलेला आहे. ‘रा.चिं ढेरे अ ना देशपांडे, अ.का. प्रियोळकर, प्र.न. जोशी, ल.रा. पांगारकर, वि.ल. भावे, बी.सी. बेद्रे’ आदी कडून भाषा अज्ञानापोटी पूर्वग्रहदूषित, जातीयवादी कलुषित भावनेतून मुस्लिम मराठी संताचे खरे अचूक आणि सत्यान्वेषन झालेच नाही. असे डॉ. नसीम देशमुख यांचे मत आहे. जे झाले ते आपापल्या आकलन सुलभ सोयीनुसार तर्क व अनुमानानुसार मूल्यमापन व चिकित्सक झाली ते दिशाभूल करणारेच आहे. असे मूल्यमापन करून संशोधन होत असेल, तर येणाऱ्या नव्या पिढीनी डोळे झाकून वाचून वाचन न करता त्यांचा तार्कीक व मुळासकट तळ शोधून सजग व डोळसपणे नवीन संशोधन पुनर्मांडणी करणे आजच्या काळाची गरज आहे. निरपेक्ष नजरेतून संताचे पुन्हा पुन्हा संशोधन झाल्यास अनेक शतकांच्या अनुमानकपोलकल्पित अवगुंठनाचा अंधार नष्ट होऊन चंद्रासारखी शितलता आणि सुर्यासारची सत्यता व प्रखरता चमकेल.

**संत शेख महंमदांच्या अभंगातील प्रासंगिकता**

**प्रा.डॉ. कल्याण गोपनर**

**संदर्भग्रंथ:**

1) रा. चि. ढेरे - 'मुसलमान मराठी संतकवी', पद्मगंधा प्रकाशन, तृतीयावृत्ती 2008, पृ.80.
2) रवींद्र गोळे (संपादक)- 'अभंग सेतू - संत वचनाचे अनुवाद भाग-1' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती 2018, पृ.160.
3) डॉ. नसीम ए. देशमुख - 'मुस्लिम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', महाराष्ट्र मुस्लिम मराठी साहित्या चळवळ, जळगाव प्रथमावृत्ती 2013, पृ.19
4) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 81
5) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 88
6) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 81
7) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 81
8) डॉ. नसीम ए. देशमुख - तत्रैव पृ. 20-21
9) डॉ. नसीम ए. देशमुख - तत्रैव पृ. 21
10) डॉ. नसीम ए. देशमुख - तत्रैव पृ. 21
11) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 81
12) रवींद्र गोळे - तत्रैव पृ. 161
13) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 79
14) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 85
15) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 86
16) रा.चि. ढेरे - तत्रैव पृ. 98
17) डॉ. नसीम ए. देशमुख - तत्रैव, पृ. 20
18) डॉ. कल्पलता नातू - 'संत साहित्यातील मिथकांचे रहस्य' सायन पब्लिकेशन्स पुणे, प्रथमावृत्ती 2014
19) डॉ. विजयकुमार फड - 'श्री ज्ञानेश्वरीतील आनंद लहरी' कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती 2012

**संत शेख महंमदांच्या अभंगातील प्रासंगिकता**

**प्रा.डॉ. कल्याण गोपनर**